ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Volume I Issue II July to Sept 2023**



**ARTS | COMMERCE**
**SCIENCE | AGRICULTURE**
**EDUCATION | MANAGEMENT**
**MEDICAL | ENGINEERING & IT I LAW**
**PHARMACY | PHYSICAL EDUCATION**
**SOCIAL SCIENCE | JOURNALISM**
**MUSIC | LIBRARY SCIENCE |**



www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with OKEN Scanner

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

*Volume I, Issue II*
*July to Sept. 2023*
Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
E-mail : Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U. Aurangabad & Ex.Vice Chancellor Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Principal Gautam Patil**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Prof. Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U,Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept, of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration,
Kalikadevi College, Shirur (K.), Dist.Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha, Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College,
Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

**Dr.Madhukar Jadhav**
Shri. Vyankatesh mahavidyalya,
Deulgaonraja, Buldana

**PEER REVIEW / REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

Mr. Ramesh Ringne
Prof. Bapu Ghokshe
Mr. Shivaji Kakade
Dr. Shakur Shaikh Husain

Mr. Vinod Kirdak
Dr. Datta Tangalwad
Mr. Kalandar Pathan
Dr. Suhas Morale
Dr. Baliram Katare

Assit.Prof.Mohan Kalkute
Dr. Adgaonkar Ganesh
Dr. Santosh Chavan
Dr. Rajkumar Yallawad

Scanned with OKEN Scanner

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Enhancing Library Services with QR Code Technology : A Scientific Exploration | Pramod N. Alone | 1-4 |
| 2 | Women And Indian Politics | Mr. Sangram R. Solanke | 5-9 |
| 3 | Electric Vehicle Charging Station monitoring using Open Charge Point Protocol | Miss Minal Nitin Songirkar | 10-15 |
| 4 | Impact Of Urbanization On Environment In India | Panchal Narayan Hanmantrao | 16-23 |
| 5 | The Influence of Sounds | Prof. Vishal V. Korde | 24-25 |
| 6 | ना.धों. महानोर यांच्या कवितेतील निसर्ग : एक आकलन | प्रो.डॉ.सुभाष निवृत्ती शेकडे | 26-32 |
| 7 | NEP २०२० मधील शिक्षण प्रशिक्षणातील बदलता प्रवाह | प्रा.डॉ.वैशाली शा. कंकाळे | 33-39 |
| 8 | हमीद दलवाई यांचे मुस्लिम विषयक विचार | प्रा.डॉ.सोपान माणिकराव सुरवसे | 40-43 |
| 9 | भटक्या - विमुक्तांच्या साहित्यावर चळवळीचा पडलेला प्रभाव | डॉ.संजय बालाघाटे | 44-49 |
| 10 | महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार | सुरेखा नवनाथ सातव | 50-53 |
| 11 | रंगमंच आणि चित्रपटाचे सादरीकरण व त्यांच्या पध्दती | अनिल आप्पासाहेब वडे<br>प्रा.डॉ.संजय पाटील | 54-58 |
| 12 | समकालीन दलित कहानी और मोहनदास नैमिशराय | राहुल गोपाल गुरखुदे<br>प्रोफेसर डॉ बाबासाहेब कोकाटे | 59-64 |
| 13 | किन्नर बच्चे की परवरिश से उत्पन्न पारिवारिक त्रासदी का महाख्यान : मेरे हिस्से की धूप | प्रोफेसर डॉ.एकनाथ श्रीपती पाटील | 65-70 |
| 14 | सांगीतीक नाद का प्रवाह | प्रा.दिपक महादेव जामनिक | 71-74 |
| 15 | राजस्थान में प्रमुख जनजातियाँ क्षेत्र : दशा एवं दिशा | हेमंत कुमार | 75-78 |
| 16 | महाराष्ट्रातील सहकारी.चळवळीचा विकास | डॉ.बाबासाहेब रघुनाथ पंदरकर | 79-83 |
| 17 | सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्वतंत्र आंदोलनातील योगदान | प्रा.डॉ.शेख हुसेन इमाम | 84-87 |
| 18 | भारतीय संघराज्य निर्मिती आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण | 88-91 |
| 19 | विश्वप्रसिध्द किर्तीमान - १०८ फूट भगवान ऋषभदेव ऋषभगिरी, मांगीतुंगी प्रतिमा निर्माण प्रेरणास्त्रोत - गणिनीप्रमुख विश्वविभूती - श्री.ज्ञानमती माताजी | प्राचार्य डॉ.नवनाथ आघाव | 92-96 |
| 20 | विंडो ड्रेसिंग :- हिशोबातील खोटेपणा किंवा आर्थिक परिस्थितीचा देखावा किंवा गवाक्ष प्रसाधन | स्वाती विश्वनाथ कोंढाळकर<br>प्राचार्य डॉ.रमेश दगु दरेकर | 97-101 |


Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास

डॉ.बाबासाहेब रघुनाथ पंदरकर
सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगाव, पिसा ता.श्रीगोंदा जि.अहमदनगर

**प्रस्तावना:**

औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलशाही समाज व्यवस्था अस्तित्वात आली. श्रमिक कष्टकरी, भांडवलदार, शोषक असे वर्ग निर्माण झाले. मजुरांचे शोषण करुन भांडवलदार धनिक झाले होत व कामगार गरीब बनले होते. त्यामुळे आर्थिक विषमता समाजात वाढीस लागली होती. लघू उद्योग बंद पडले, बेकारांची संख्यात्मक वाढझाली. खेडयातील लोक शहरात आले, काम आणि वेतन यामध्ये मेळ नव्हता. अतिरिक्त मुल्य मिळविण्याच्या पाठीमागे उत्पादक, भांडवलदार धावत होते म्हणूनच प्रसिध्द राजकीय विचारवंत कार्ल मार्क्स यांना याला वर्गलढा असे नाव दिले. या सर्व शोषीत समाजाला शोषणापासून बाहेर काढण्यासाठी सहकाराची गरज निर्माण झाली.

१९४४ साली सॅराडेल पायोनिअर्स या रुपाने सहकार चळवळीची सुरुवात लंडनमध्ये म्हणजे युरोपामध्ये सर्वप्रथम झाली. भारतात सहकारी पतसंस्थाचा उगम होण्यास ग्रामीण शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व सावकाराद्वारे होणारी पिळवणूक कारणीभूत आहे. १९ व्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात सहकारी पतसंस्थाची स्थापना झाली. सर्वप्रथम भारतात मुंबई प्रांतातील पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यात शेतकरी बॅक स्थापण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर ५ फेब्रुवारी १८८९ ला मुंबई प्रांतातील बडोदा येथे प्रा. विठ्ठल कवडेकर यांनी अन्योन्य सहकारी संस्था कामगारांच्या एकत्रित मदतीने स्थापन केली. त्यानंतर ८ ते १९०५ ला जिल्हा धारवाड येथील कणगीहल येथे ग्रामीण सहकारी पतसंस्था स्थापन झाली.

**उद्दिष्टे:**

१) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या प्रगतीचा आढावा घेणे.

२) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे महत्व व उपयोगीता अभ्यासणे.

३) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विकासाच्या टप्प्यांचा अभ्यास करणे.

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळ:**

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासात सहकार चळवळीचे भरीव योगदान आहे. सुरुवातीला सहकार चळवळ मुख्यत्वे कृषी व वित पुरवठा या क्षेत्रापुरती मर्यादित होती. त्यानंतर कृषी प्रक्रीया पणन, गृहनिर्माण, दुग्धव्यवसाय, साठवणूक, वस्त्रोद्योग, वित, मस्त्य व्यवसाय अशा विविध क्षेत्रात विस्तारली आहे.सहकार म्हणजे सारख्या विचारसणीचे लोक एकत्र येवून एखादी उलाढाल



Scanned with OKEN Scanner

करणारी संस्था स्थापन करणे होय. अगदी सुरुवातीच्या कालखंडामध्ये इंग्लंडमध्ये सहकरी तत्वावर असणारी शेतकरी संस्था स्थापन झालेली होती. भारतामध्ये शेती करणारा शेतकरी सावकाराच्या कच्चाटयात सापडून पिळून निघत होता. अगदी त्याच कालखंडात सन १९०४ साली सहकारी कायदा मंजूर झाला. त्या कायद्यान्वये भारतात सहकारी तत्वावर संस्था उभ्या करण्याची परवानगी मिळू लागली. आधीच्या कालखंडातील सहकारी पतपेढया यांचे स्वरुप केवळ शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्था असेच स्वरुप होते. आजच्या घडीला सहकारी चळवळ अनेक उद्यो व्यवसायात वाढलेली दिसते.

१९०४ च्या सहकारी कायद्यामुळे सहकार चळवळीला एक कायद्याची चौकट प्राप्त झाली. १९१२ साली कायद्यात सुधारणा होवून केवळ आर्थिक व्यवहार न करणाऱ्या सहकारी संस्थांनाही परवानगी मिळू लागली. लगोलग १९१९ साली मुंबई सरकारने यासंदर्भात कायदा केला. त्याचेच अनुकरण प. बंगाल, मद्रास, बिहार व ओरिसा या सरकारांनी केले. १९२९ सालापर्यंत तर जागतिक युध्द व मंदी या कारणांमुळे सहकारी संस्थाचे आर्थिक गणित कोलमडल्यामुळे पंजाब, हरियाणा, बिहार या प्रांतातल्या बऱ्याच संस्था बंद पडल्या. मुंबई प्रांतातल्या संस्थांचे ९३ टक्के कर्ज हे विनावसूलीत होते. यावरुन आर्थिक स्थिती किती भीषण होती हे लक्षात येते.

स्न १९९५ साली भारतीय रिझर्व बॅक अस्तित्वात आली. तिच्यात असलेल्या सहकरी खात्याने १९३७ साली सहकारी संस्थांना अग्रक्रम देण्याची सुचना केली. १९३९ ते १९४७ सालात अनेक शेतीव्यतिरिक्त सहकारी संस्था अस्तित्वात आल्या. यात प्रामुख्याने सहकारी ग्राहक भांडार, युध्दात पुरवठा करणाऱ्या संस्था आदी संस्था अस्तित्वात आल्या. शेतकरी आपआपल्या कर्जाची परतफेड करु लागल्याने सहकारी संस्था मजबूत होवू लागल्या. याच काळात गुजरात सहकारी दुध महासंघाचे अमुल अस्तित्वात आली. १९४८ साली पायाभरणी होवून १९५१ साली आशिया खंडातील पहिला साखर कारखाना प्रवरानगर सहकारी साखर कारखाना चालू झाला. ही महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशी घटना आहे. पद्मश्री विठ्ठलराव विखे–पाटील यांचे नाव या निमित्ताने सहकारी इतिहासात कायम लक्षात राहील. नंतर लाल बहादूर शास्त्रींच्या काळात सहकार क्षेत्र हे पंचवार्षिक नियोजन योजनांमध्येही लक्षात घेतले जावू लागले. त्यानंतर राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बॅक ही सहकारी बॅकावर लक्ष ठेवणारी संस्था अस्तित्वात आली.

१९६० च्या दशकात महाराष्ट्रातून डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, श्री. दे.गो.कर्वे, ना. गोखले व पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील आदींचे समर्थ नेतृत्व लाभले. कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकर सहकारी संस्थेने भारतातील पहिली सहकारी तत्वावरील सुतगिरणी इचलकरंजी येथे स्थापन झाली. देशातील सर्वात जास्त गाळप क्षमता असणारा शेतकरी सहकारी साखर कारखाना सांगली येथे स्थापन झाला. सांगली, सातारा, कोल्हापूर व अहमदनगर हे जिल्हे सहकार क्षेत्रात अग्रेसर राहिले.



Scanned with OKEN Scanner

सहकाराची व्याप्ती हळूहळू मराठवाडा, विदर्भ खान्देशपर्यंत वाढली. राज्यातील रोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी मोठा हातभार लावला असून एक सहकारी साखर कारखाना सुमारे पाच–सहा हजार लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळवून देतो. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासातील सहकारी साखर कारखान्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

तक्ता क्र. १.१

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती

| बाब | १९७०–७१ | १९८०–८१ | १९९०–९१ | २०००–०१ | २०१०–११ | २०१९–२० | २०२०–२१ | २०२१–२२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण सहकारी सस्था | ४२५९७ | ६०७४७ | १०४६२० | १५८०१६ | २२४३०६ | २१२९५१ | २१७१४० | २२२७३८ |
| एकूण सभासद ('०००) | ८५८१ | १४७८३ | २६९०३ | ४३०२२ | ५३०२२ | ५७४८७ | ५८१५० | ५९०३३ |
| खेळते भांडवल (कोटीमध्ये) | १४८९ | ५२१० | २४२८४ | १३४४८० | २८८४३४ | ४२४४०२ | ४४९९६६ | ४६९०२० |
| स्थूल कर्ज (कोटीमध्ये) | १०९८ | २९३४ | १५१४८ | ७२०६७ | १००६८१ | १६५७४१ | १६०१२९ | १५९८५३ |
| येणे कर्जे (कोटीमध्ये) | ८८३ | २३११ | १२०६२ | ६७६५३ | १११८६२ | १७०३७८ | १८७६५१ | १९३३११ |
| उलाढाव–तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (कोटीमध्ये) | ५३१ | २३५३ | ६६३८ | १३३३९ | ५२२२५ | ३१५३४ | ४७६३९ | ५०२८८ |

स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, पान नं. १६६, १६७

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, १९७१–७१ मध्ये एकूण सहकारी संस्थाची संख्या ४२५९७ इतकी होती ती २०२१–२२ पर्यंत २,२२,७३८ एवढी झालेली दिसून येते. म्हणजेच ५२ वर्षात महाराष्ट्रात सहकारी संस्थाची संख्या २,२२,७३८ एवढया प्रचंड प्रमाणात वाढलेली दिसून येते. तर सन २०२१–२२ अखेर ५९०३३ हजार इतकी सहकारी सोसायटयाचे सभासद संख्या आहे.

**सहकाराचे महत्व व उपयुक्तता:**

१. सहकारामुळे धर्म, जात, पंथ, लिंग व सामाजिक प्रतिष्ठा या सारख्या गोष्टीं दूर होवून समाजामध्ये सामाजिक समता निर्माण होण्यास मदत झालेली आहे.

२. आर्थिकदृष्टा दुर्बल किंवा कमकुवत वर्गास स्वत:ची सामाजिक आणि आर्थिक प्रतिष्ठा वाढविण्यास सहकारामुळे मदत झालेली आहे.



Scanned with OKEN Scanner

३. सहकारी संस्थामार्फत उत्पादकाकडून माल खरेदी करुन उच्च दर्जाचा स्वच्छ मालक ग्राहक सभासदाच्या मागणीनुसार माफक किंमतीत उपलब्ध झाल्यामुळे खाजगी विपणन व व्यापारी व्यवस्थेतील मध्यस्थांचे उच्चाटन होण्यास मदत झालेली आहे.

४. सहकाराच्या माध्यमातून कृषी क्षेत्र, सामाजिक क्षेत्र व शैक्षणिक विकास घडून ग्रामीण व मागासलेल्या भागातील लोकांचा आर्थिक व सामाजिक बदल घडवून आणण्यात सहज शक्य झाले आहे.

५. मागासलेल्या भागात बेकारी, दारिद्रय, लोकसंख्यावाढ आर्थिक व सामाजिक मागासलेपणा यासारख्या समस्यांचे निराकरण सहकारी चळवळीमुळ शक्य झाले आहे.

६. सहकारी तत्वावर उभारलेल्या सुतगिरणी, साखर कारखाने, मासेमारी, भातगिरण्या, बॅंका, प्रक्रीया उद्योग यासारख्या उद्योगांमुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढझाली आहे.

७. सहकारामुळे कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणावर वाढलेला आहे.

**सहकारातील उणिवा व दोषः**

१. सहकाराची झालेली वाढ ही केवळ संख्यात्मक वाढ होती असे म्हणावे लागेल कारण सहकाराचे वरील फायदे बधितल्यास समाजाची पाहिजे त्या प्रमाणात प्रगती झालेली नाही. पहिल्यांदा सहकारी तत्वावर पतपेढया शेतकऱ्याला सावकारी पेचातून बाहेर काढण्यासाठी निर्माण झाल्या होत्या. आजही शेतकऱ्याची परिस्थिती पुर्वीप्रमाणे असल्याचे दिसते. सावकाराच्या विळख्यातून शेतकरी आजूनही बाहेर पडलेला नाही. त्यामुळे आजही शेतकरी आत्महत्या करत आहे.

२. सहकारी संस्थांचा अकार्यक्षमपणा, वाढती थकबाकी भष्टाचार यासारख्या कारणांमुळे आनेक सहकारी बॅंका थकबाकीत जावून बंद होत आहेत.

३. सहकारी चळवळीचा विकास हा काही राज्यांपुरता मर्यादित राहिला आहे. देशात पुर्वेकडील राज्यात ही चळवळ केवळ नावालाच राहिलेली आहे.

४. राजकीय पक्ष आणि सत्ताधाऱ्यांनी सहकारी संस्थांचा उपयोग स्वतःच्या मालमत्तेसारखा करुन घेण्यास सुरुवात केली आहे. सहकार क्षेत्रात घराणेशाहीमुळे आप्टेष्ट लोकांनाच सभासद करुन घेणे, नियमामधून उपवाद शोधणे, निवडणूकीत गौरप्रकार करणे, कर्मचारी म्हणून नातेवाईकांच्या नेमणूका करणे इत्यादी प्रकार सर्रास होताना दिसतात.

**सारांशः**

सहकार चळवळ ही लोकाभिमुख चळवळ असून या चळवळी मध्ये सर्वांनी एकत्र येवून काम केले तर ही चळवळ सक्षम होईल. सहकाराच्या माध्यमातून लोकांचा विकास करण्यास मदत होते.विना सहकार नाही उध्दार या सहकारी तत्वामुळे स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळ बहरली आहे. व तिचे कार्य आजही चालू आहे. सहकारी तत्वामुळे भांडवलदार यांचे वचर्स्व कमी झाले आहे. सहकारामुळे सर्वांना संरक्षण मिळाले आहे. सहकारामुळे मनुष्य अनेक गोष्टी शिकतो त्यातून



Scanned with OKEN Scanner

एकमेकांची प्रगती साधतो हे सहकाराने दाखवून दिले आहे. परंतु अलिकडील काळात जागतीकीकरणामुळे जे आर्थिक बदल झाले त्यामुळे सहकारी संस्थांना बाजारातील स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. सहकारी संस्थांना त्यांना वित्तीय पाया बळकट करावा लागणार आहे. खाजगी क्षेत्राशी स्पर्धा करावी लागत असल्यामुळे सहकरी संस्थांनी त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सहकारापुढील आव्हाने यशस्वीपणे पेलावली तर भारतातील सहकारी चळवळीचे भवितव्य उज्वल राहील.

संदर्भ:

१. सहकार तत्व आणि व्यवहार— पी. आर. कुलकर्णी
२. डॉ. मेघा कानेटकर व डॉ. वैशाली रुईकर— सहकार आणि ग्रामीण विकास
३. सहकार तत्व व व्यवहार— कामत गो. स.
४. सहकार तत्व आणि व्यवहार— प्रा. रायखेलकर व डांगे
५. महाराष्ट्राची आर्थिक पाहीणी २०२१—२२, महाराष्ट्र शासन
६. www.loksatta.com
७. www.esakal.com

◆◆◆

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar



Scanned with OKEN Scanner